अभिनेत्री कृतिका कामरा नेहमीच तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल खूप सावध ,खूप खाजगीपण जपत राहिली आहे ., परंतु तिथे काय अलीकडील सोशल मीडिया पोस्टमुळे चाहत्यांमध्ये एक नवीन चर्चा सुरू झाली आहे. तिच्या नवीन पोस्टमुळे लोक असा अंदाज लावू लागले आहेत की कदाचित कृतिकाला आता तिच्या आयुष्यात एक खास व्यक्ती सापडली आहे. ती प्रेमात पडली आहे !



# अभिनेत्री कृतिका कामरा प्रेमात पडली !

हे सर्व तिच्या दिवाळी पोस्टने सुरू झाले, जिथे कृतिका एका सुंदर पारंपारिक पोशाखात दिसली - पण मुख्य आकर्षण म्हणजे ती एका पुरूषाचा हात धरून बसलेली दिसली ज्याचा चेहरा जाणूनबुजून लपवण्यात आला होता. त्या फोटोने लगेचच सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि लोक विचारू लागले की तिच्या जीवनात आलेला , ती ज्याचा प्रेमात पडली तो आहे तरी कोण ?

त्यानंतर, त्याच्या वाढदिवसाच्या फोटोंनी आणखीनच चर्चा निर्माण केली. मित्रमैत्रिणी, उत्सव आणि चविष्ट जेवणाच्या दरम्यान, काही फोटोंनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याचे सहकारी देखील या मजेत सामील झाले - सोहा अली खानने लिहिले, 'एचडीहब केके'... मी पाहिले की तू तिथे काय केलेस! आणि पूजा गोरने गमतीशीरपणे टिप्पणी केली, 'अहम अहम.'

चाहतेही मागे नव्हते - अनेकांनी कृतिकाच्या प्रियकराबद्दल उत्सुकता व्यक्त केली. आता, तिच्या नवीनतम इंस्टाग्राम स्टोरीने सर्वांची उत्सुकता वाढवली आहे - त्यात कृतिका कोणासोबत तरी आरशासमोर उभी असल्याचे दाखवले आहे, परंतु चेहरे पुन्हा लपलेले आहेत. या छोट्याशा झलकांसह, कृतिकाने तिच्या चाहत्यांना उत्सुकता जिवंत ठेवण्यासाठी पुरेशी माहिती दिली आहे.

मराठी टेलिव्हिजन विश्वात गोष्ट सादर करण्याचा नवा प्रयोग असलेली आणि प्रेक्षकांच्या पसंतीचा विषय ठरलेली कलर्स मराठीवरील 'बाईपण जिंदाबाद' ही मालिका सुरुवातीपासूनच स्त्रीचा आयुष्याकडे पाहण्याचा वास्तववादी दृष्टिकोन सादर करते आहे. समाजातील स्त्रीत्वाच्या बदलणाऱ्या संकल्पना या मालिकेने अगदी चपखल सादर केल्या असून प्रत्येक वेळी नात्यांच्या, भावनांच्या आणि तिच्या मनातल्या द्वंद्वाच्या कथा सांगितल्या आहेत. या मालिकेत येणारी नवी कथा 'शर्ट' ही त्याच प्रवासातील एक संवेदनशील आणि मनाला भिडणारी कथा आहे.



# 'शर्ट' मध्ये उलगडणार स्त्रीत्वाचा नवा पैलू!

या कथेचं शीर्षक आणि त्यातून उलगडणारी कथा दोन स्त्रियांच्या जीवनातील अनोख्या नात्यांचा अकल्पित प्रवास मांडते. एका अनपेक्षित भेटीतून सुरू होणारा हा प्रवास दुःख, अपराधीपणा आणि क्षमेच्या भावनेतून एका नव्या नात्याची बीजे रुजवतो. आजच्या स्त्रीची ही गोष्ट प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडेल — कधी डोळ्याच्या कडेला ओलावेल.

श्रेया घोषाल ही तिच्या अनेक गाजलेल्या गाण्यांसाठी ओळखली जाते. फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगभरात तिचा चाहतावर्ग आहे. तिने विविध भाषांमधील चित्रपटांसाठी गाणी गायली आहेत.

# श्रेया घोषालच्या कॉन्सर्टमध्ये गोंधळ



श्रेया घोषाल कॉन्सर्ट मधूनदेखील चाहत्यांच्या भेटीस येते. तिचे कॉन्सर्ट जगभरात होतात. तिच्या या कार्यक्रमांना चाहत्यांची मोठी गर्दी होते. श्रेयाला प्रत्यक्षात गाताना ऐकणे, पाहणे ही चाहत्यांसाठी मोठी पर्वणी असते. नुकताच गायिकेचा ओडिशा राज्यातील कटकमध्ये कॉन्सर्ट आयोजित केला होता. बालीयात्रा मैदानात हा कॉन्सर्ट आयोजित केला होता. या कॉन्सर्टला मोठी गर्दी झाली होती. मात्र, यादरम्यान मोठा गोंधळ निर्माण झाला. मिळालेल्या माहितीनुसार, गर्दीने धक्काबुक्की करायला सुरुवात केली. स्टेजजवळ हा प्रकार घडला. इतकी धक्काबुक्की सुरू झाली की स्टेजजवळील लोक स्वतःला त्यातून वाचवण्याचा प्रयत्न करत होते. श्रेयाला पाहण्यासाठी हा गोंधळ निर्माण झाला होता. या सगळ्यात दोन जण बेशुद्ध पडले, ज्यामध्ये एका तरुणीचा समावेश आहे. त्यांना लगेचच उपचारासाठी नेण्यात आले. त्यानंतर सुरक्षेच्या दृष्टीने आयोजक आणि पोलिसांनी गर्दीला नियंत्रणात आणण्यासाठी अतिरिक्त पोलिस बंदोबस्त ठेवला. लाठीचार्ज करून गर्दीला नियंत्रित केले.

झी मराठी वाहिनीवरील लोकप्रिय मालिका ₹लक्ष्मी निवास₹ या मालिकेतील 'लक्ष्मी'ची भूमिका साकारणारी अभिनेत्री हर्षदा खानविलकर,तिला प्रेमाने 'इंडस्ट्रीची मम्मा' म्हणूनही ओळखले जात, ती आज लहान मुलांची पण 'मम्मा' झाली, याचं कारणही असंच विशेष आहे. हर्षदा खानविलकर यांनी नुकतंच एका विशेष उपक्रमाद्वारे हे दाखवून दिल आहे.



# हर्षदा खानविलकरचे सामाजिक दायित्व

हर्षदा मालिकेत 'लक्ष्मी' एक अशी आई साकारत आहे, जी आपल्या मुलांसाठी कुटुंबासाठी झटते आहे. त्यासाठी प्रामाणिकपणे मेहनत घेते आहे. या मालिकेची संपूर्ण टीम हल्लीच 'चला हवा येऊ द्या' च्या एका विशेष भागात सहभागी झाली होती. या मंचावर अनेक किस्से सांगितले गेले. हर्षदा खानविलकरने आपल्या आयुष्यातील काही खणखणीत अनुभवही शेअर केले. त्याचवेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालक अभिजीत खांडकेकर यांनी त्यांच्या या आईसारख्या व्यक्तिमत्त्वाचा उल्लेख करत त्यांची 'तुळा' केली ज्यातून गरजू मुलांना वह्या पुस्तक दान केली जाणार होती. या गोष्टीने हर्षदा खानविलकर यांना आश्चर्यचकित केले. यात तराजूच्या एक बाजूवर हर्षदा खानविलकर बसल्या, तर दुसऱ्या बाजूवर वह्या पुस्तकं ठेवली गेली. केवळ त्या क्षणी हे काम संपले नाही. हर्षदा खानविलकर यांनी स्वतः संकल्प केला की ती पुस्तके त्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतील. त्यासाठी हीच वह्या पुस्तके घेऊन त्या स्वतः पोहचल्या सांगलीला श्री दत्त विद्यामंदिर, नरसोबाची वाडी, येथे आणि येथील गरजू शाळेच्या विद्यार्थ्यांना त्या भेट म्हणून दिल्या. या अनुभवाबद्दल हर्षदा खानविलकर म्हणतात – "आयुष्यात कधी कधी अनपेक्षित गोष्टी घडतात आणि त्या आत्मिक आनंद देतात कारण त्या अनपेक्षित असतात. हे वर्ष माझ्यासाठी अशाच आनंदाचे वर्ष आहे आणि याचे कारण आहे आपली झी मराठी. २०२५ च्या सुरुवातीला आमची मालिका 'लक्ष्मी निवास' प्रक्षेपित झाली.

TCC

## टिसीसी कन्सेप्ट्स लिमिटेड

**नोंद. कार्यालय:** ५ वा मजला, व्हीपी कॅपिटॉल बिल्डींग, रांगे हिल रोड, हॉटेल सिम्फनी समोर, भोसले नगर, शिवाजीनगर, पुणे ४११००७. महाराष्ट्र | **सीआयएन:** एल६८२००पीएन१९८४पीएलसी२२२१४०. **संपर्क:** + ९१ ८६००४६१९०० | **ई-मेल :** compliance@tccltd.in | **संकेतस्थळ :** www.tccltd.in

**सप्टेंबर ३०, २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षासाठी अलेखापरीक्षित (एकमेव आणि एकत्रिकृत) वित्तिय निष्कर्षांचे निवेदन**

कंपनीच्या संचालक मंडळाने १३ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत ३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीसाठी कंपनीच्या अलेखापरिक्षित आर्थिक निष्कर्षांना **("आर्थिक निष्कर्ष")** मान्यता दिली आहे.

मर्यादित पुनरावलोकन अहवालासह आर्थिक निकाल कंपनीचे संकेतस्थळ https://tccltd.in/wp-content/uploads/ 2025/10/SE_Reg33_Disclosure.pdf वर देखील अपलोड केले आहेत आणि देण्यात आलेल्याक्यूआर कोड स्कॅन करून देखील ते प्राप्त करता येतील.

**टिसीसी कन्सेप्ट्स लिमिटेड च्या संचालक मंडळाकरीता आणि त्यांच्या वतीने**
**सही/-**
**उमेश कुमार सहाय**
**व्यवस्थापकीय संचालक**
**दिनांक : नोव्हेंबर १३, २०२५**
**ठिकाण : पुणे**
**डीआयएन : ०१७३३०६०**

MKP MOBILITY LTD

## एमकेपी मॉबिलीटी लिमिटेड

**सीआयएन : एल५०१००पीएन१९९०पीएलसी२४२३३६**
**पत्ता: गट क्र. ६२४, विजय हॉटेल मागे, वडकी नाका, वडकी, पुणे, हवेली, महाराष्ट्र, भारत ४१२३०८.**
**संपर्क: info@mkpmobility.com , मोबा. क्र. + ९१ ८७९९९१३०३० संकेतस्थळ : www.mkpmobility.com**

**सप्टेंबर ३०, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिक/ अर्ध वर्षासाठी अलेखापरीक्षित एकमेव आणि एकत्रिकृत वित्तिय निष्कर्षांचा आराखडा**

कंपनीच्या **सप्टेंबर ३०, २०२५** रोजी संपलेल्या त्रैमासिक / अर्ध वर्षासाठी अलेखापरीक्षित एकमेव आणि एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षांचे ("वित्तिय निष्कर्ष") लेखा परीक्षण समितीद्वारे समीक्षण आणि शिफारस करण्यात आले आहे आणि कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे **नोव्हेंबर १३, २०२५** रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकीमध्ये ते संमत करण्यात आले आहेत.

लेखा परीक्षण अहवालासोबत वित्तिय निष्कर्ष कंपनीच्या https://mkpmobility.com/wp_content/uploads/2025/11/Q2-result-2526.pdf वर प्रसिद्ध करण्यात आला आहे आणि क्यूआर कोड स्कॅन करून प्राप्त करता येईल.

**मंडळाच्या आदेशाद्वारे**
**सही/-**
**जितेश एम. पटोदिया**
**व्यवस्थापकीय संचालक (डीआयएन: ०९७००७१८)**
**ठिकाण: पुणे**
**दिनांक: नोव्हेंबर १३, २०२५**

*टिप: सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोजर्स रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या नियम ४७(१) सह वाचल्या जाणाऱ्या नियम ३३ अनुषंगाने उपरोक्त सूचना देण्यात येत आहे.*

GB GLOBAL

## जीबी ग्लोबल लिमिटेड

(पूर्वीची मंधाना इंडस्ट्रीज लिमिटेड म्हणून ज्ञात)
सीआयएन : L17120MH1984PLC033553
**नोंदणीकृत कार्यालय :** १० वा मजला, देव प्लाझा, अंधेरी फायर स्टेशनजवळ, एस. व्ही. रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०० ०५८.
**दूर. :** ०२२-४३५३ ९१९१ **ई-मेल आयडी :** cs@gbglobal.in **वेबसाइट :** www.gbgloble.in

**दि. ३०.०९.२०२५ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा सारांश**

(रक्कम रु. लाखांत, उत्पन्न प्रतिशेअर वगळता)

| अ. क्र. | तपशील | स्थायी | | | | एकत्रित | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तिमाहीअखेर | | | वर्षअखेर | तिमाहीअखेर | | | वर्षअखेर |
| | | ३०.०९.२०२५ | ३०.०६.२०२५ | ३०.०९.२०२४ | ३१.०३.२०२५ | ३०.०९.२०२५ | ३०.०६.२०२५ | ३०.०९.२०२४ | ३१.०३.२०२५ |
| | | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| १ | एकूण उत्पन्न | ३,३४०.२० | ४,४८६.३५ | ४,४६३.०१ | २९,१२२.२५ | ३,३२९.४४ | ४,५८०.५९ | ४,४६३.२८ | २९,१४८.७१ |
| २ | कालावधीकरिता (कर, अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपूर्व) निव्वळ नफा/(तोटा) | ८१.७९ | १,७३२.२९ | ४१३.९१ | ११३८०.६३ | ५४.७० | १,४६८.६४ | ३७८.६६ | ११,१७४.७३ |
| ३ | करपूर्व कालावधीकरिता (अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपश्चात) निव्वळ नफा/(तोटा) | ८१.७९ | १,७३२.२९ | ४१३.९१ | १०,८८०.०८ | ५४.७० | १,४६८.६४ | ३७८.६६ | १०,६७४.१८ |
| ४ | करपश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपश्चात, परंतु जॉइंट व्हेंचर्स व असोसिएट्स यांच्या नफ्यातील हिश्श्यापूर्व) | ४३.२० | १,५२४.५० | ३०७.०३ | १०,८२१.५६ | १६.११ | १,२६०.८५ | २७१.७८ | १०,६१५.३५ |
| ५ | वर्षाकरिताचा नफा | २६.६६ | १,५२४.८६ | ३०१.८३ | १०,८१६.३६ | (०.४५) | १,२६१.२१ | २६६.५८ | १०,६१०.१५ |
| ६ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता (करपश्चात) नफा/(तोटा) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश) | २७.०९ | १,५२५.२९ | ३०३.५२ | १०,८१८.०९ | (०.०२) | १,२६१.६४ | २६८.२७ | १०,६११.८८ |
| ७ | समभाग भांडवल | ५,००३.३१ | ५,००३.३१ | ५,००३.३१ | ५,००३.३१ | ५,००३.३१ | ५,००३.३१ | ५,००३.३१ | ५,००३.३१ |
| ८ | उत्पन्न प्रतिशेअर (रु.) (प्रत्येकी रु. १०/-) | | | | | | | | |
| | प्रत्येकी रु. १०/- च्या अपवादात्मक बाबीपूर्व ईपीएस : मूलभूत व सौम्यीकृत | ०.५० | ३.०५ | ०.६० | २२.६२ | - | २.५२ | ०.५३ | २२.२१ |
| | प्रत्येकी रु. १०/- च्या अपवादात्मक बाबीपश्चात ईपीएस : मूलभूत व सौम्यीकृत | ०.५० | ३.०५ | ०.६० | २१.६२ | - | २.५२ | ०.५३ | २१.२१ |

**टीपा :**

१. वरील विवरण हे सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत बॉम्बे स्टॉक एक्सचेंज लिमिटेड व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडियाकडे दाखल करण्यात आलेल्या दि. ३०.०९.२०२५ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या अलेखापरीक्षित स्थायी व एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. दि. ३०.०९.२०२५ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या वरील वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाइट्स अर्थात www.bseindia.com व www.nseindia.com वर तसेच कंपनीची वेबसाइट www.gbglobal.in वर उपलब्ध आहे. सदर तपशील दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून प्राप्त करता येऊ शकेल.

२. सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन ३३ अंतर्गत दि. ३०.०९.२०२५ रोजी संपलेली तिमाही व सहामाहीकरिताच्या वरील निष्कर्षांचे कंपनीच्या संचालक मंडळाच्या लेखापरीक्षण समितीद्वारे लेखापरीक्षणाच्या अधीन आहे ज्याचे संचालकांच्या लेखापरीक्षण समितीद्वारे पुनरावलोकन करण्यात आले होते व तत्पश्चात संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. १४.११.२०२५ रोजी आयोजित सभेमध्ये त्यांना मंजुरी देण्यात आली आहे.

३. वरील वित्तीय निष्कर्ष हे कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद १३३ सहवाचन त्याअंतर्गत जारी संबंधित नियमांतर्गत विहित भारतीय लेखा मानकांनुसार (आयएनडी एएस) तयार करण्यात आले आहेत. गत तिमाहीकरिताचे निष्कर्षही पुन:नमूद आहेत.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १४.११.२०२५

जीबी ग्लोबल लिमिटेड करिता व त्यांच्या वतीने
सही/-
देव ठक्कर
अध्यक्ष

# 'स्वत:च्या आरोग्याचे स्वत: व्हा डॉक्टर'

मिलिंद सोमणने त्याच्या आणि इतरांनी काय खावे -काय टाळावे ,प्रथिने ,क्षार ,जीवनसत्वं अशा अनेक महत्वाच्या मुद्द्यांवर आपली मतं व्यक्त केलीत ., त्याचा हा गोषवारा - बहुतेक भारतीयांना दररोज पुरेसे प्रथिने का मिळत नाहीत.

'तुमच्या शरीराला दररोज फक्त ४ चमचे तेलाची आवश्यकता असते' आधुनिक भारतीय घरांमध्ये, मायक्रोवेव्हमध्ये अन्न गरम करणे किंवा पुन्हा गरम करणे स्वाभाविक आहे का ?

तंत्रज्ञानामुळे, एअर फ्रायर्स हे आमच्या स्वयंपाकघरात सर्वात आकर्षक वस्तू आहे, जे शून्य ते कमीत कमी तेलात तयार केलेले निरोगी स्नॅक्स देण्याचे आश्वासन देते. वेळ आणि श्रम वाचवण्याव्यतिरिक्त, अशा गॅझेट्सचा आपल्या आरोग्याला काही फायदा होतो का? सोयीच्या शोधात, आपण पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या निरोगी आणि जागरूक खाण्याच्या सवयींशी तडजोड करत आहोत का?

आळस ही सर्वात मोठी समस्या आहे. आपल्याला गोष्टी लवकर घडाव्यात असे वाटते आणि तिथूनच समस्या सुरू होते. आपण लहान समस्यांकडे दुर्लक्ष करतो ज्यामुळे मोठ्या समस्या निर्माण होतात.

**विभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती यांचे कार्यालय**

**जाहीर प्रसिध्दकरण**

**अर्ज क्र. जन्म-मृत्यु/एसआर/६१७/२०२४**
**दिनांक ०९/०५/२०२४**

१) श्रीमती सुरेखा विजय शेडगे
रा. को-हाळे बु ता. बारामती जि. पुणे } अर्जदार

**विरुध्द**

१) ग्रामसेवक को-हाळे बु.
ग्रामपंचायत को-हाळे बु
ता. बारामती जि. पुणे } सामनेवाला

**विषयः- मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३ (२) (३) प्रमाणे अर्ज**

ज्याअर्थी, यातील अर्जदार श्रीमती सुरेखा विजय शेडगे हे वर नमूद पत्त्यावरील कायमचा रहिवासी आहे. अर्जदार यांचे पती विजय पिलाजी शेडगे यांचा मृत्यू दिनांक ११/०९/२०१५ रोजी गाव- को-हाळे बु. ता. बारामती जि. पुणे येथील अर्जदार यांचे राहत्या घरी झालेला आहे. त्यांची कार्यालयात मृत्युचे रजिस्टरला नोंद नसल्यामुळे अर्जदार यांनी मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे नोंद होऊन मृत्यू दाखला दाखला मिळण्याकामी विनंती केली आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांना मृत्यु दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणने असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत किंवा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, बारामती या कार्यालयात नेमलेली तारीख १०/०६/२०२४ रोजी पर्यंत स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणने मांडावे. कोणाचीही काही हरकत अथवा म्हणने मुदतीत न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजुन या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला घेण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण आज दिनांक ०९/०५/२०२४ रोजी आमचे सही शिक्याने प्रसिध्द केले असे

ठिकाणः बारामती सही/-
दिनांक ०९/०५/२०२४ **उपविभागीय अधिकारी**
(शिक्का) **तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती**

**जाहीर नोटीस**

**उपविभागीय दंडाधिकारी पुणे, उपविभाग पुणे यांच्या न्यायालयात**

**क्र. फौज २/कावि/९८९/२०२५**

**१. श्रीम. शाहेदा अब्दुल अहाद कश्मीरी.**
**रा. १८६, सोलापूर बाजार, कॅम्प, पुणे ... अर्जदार**

**विरुध्द**

**जन्म–मृत्यु नोंदणी निबंधक**
**पुणे महानगरपालिका ... जाबदेणार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, बरील नमुद **अर्जदार श्रीम. शाहेदा अब्दुल अहाद कश्मीरी रा. १८६, सोलापूर बाजार, कॅम्प, पुणे यांचा जन्म दि. ३०/०५/१९६६ रोजी पत्ता १८६, सोलापूर बाजार, कॅम्प, पुणे (राहत्या घरी) येथे झाला असून** अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३, कलम १३(३) प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे कागदपत्रांसोबत मांडावे. सदर दिवशी कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजुन पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि १४/११/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी ही जाहीर नोटीस दिली असे.

(शिक्का) **सही/–**
**(विठ्ठल जोशी)**
**ठिकाण : पुणे उपविभागीय दंडाधिकारी पुणे**
**दिनांक : १४/११/२०२५ उपविभाग पुणे**

**जाहीरनामा**

**श्री. पी. एम. पाटील सो, ५वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर बारामती, जि.पुणे येथील न्यायालयात**

**Civil M.A. ८४/२०२५**
**नि. क ७**

१. श्रीमती. सूर्यमाला कन्हैयालाल बोगावत व इतर ४
वय - ८० वर्षे, धंदा दू काहीनाही
रा. भिगवण ता. इंदापूर जि. पुणे
ता. इंदापूर जि. पुणे ....अर्जदार

**विरूध्द**

**कोणी नाही.**

ज्यापेक्षा अर्जदार हे मुले व पत्नी आहेत. दि. २०/१२/२०१९ रोजी कै. कन्हैयाला मुंकुंनदास बोगावत मयत झाले असून त्यांचे वारस अर्जदार १ ते ५ यांनी वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केलाआहे.

त्यापेक्षा **कै. कन्हैयाला मुंकुंनदास बोगावत** अर्जदार सदरहू मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत वारसांचे सर्टिफिकेट देईल.

**पुढील नेमलेली दिनांक १५/१२/२०२५**
**प्रति.**
**१. मयत याचे पत्यावर.**
**२. नगरपरिषद नोटीस बोर्डवर.**
**३. मे. कोर्ट नोटीस बोर्डवर.**

**हुकूमावरून,**
**सही/–**
**अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, बारामती, जि. पुणे.

# हिंद दी चादर –गुरु लाधो रे



साहिबजादेच्या प्रचंड यशानंतर, बावेजा कुटुंब आणखी एका शक्तिशाली ॲनिमेटेड चित्रपट ₹हिंद दी चादर - गुरु लाधो रे₹ घेऊन परतले आहे. बावेजा स्टुडिओज आणि इरॉस इंटरनॅशनल निर्मित, रोवेना बावेजा दिग्दर्शित, हा चित्रपट नववे शीख गुरु गुरु तेग बहादूर जी यांची प्रेरणादायी आणि भावनिक कहाणी जिवंत करतो. 'चार साहिबजादे'च्या प्रचंड यशानंतर, बावेजा कुटुंब आणखी एका शक्तिशाली ॲनिमेटेड वैशिष्ट्यासह परत येत आहे, श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या भावनिक शकाचे पवित्र पुनरुत्थान, ₹हिंद दी चादर - गुरु लाधो रे₹. हा चित्रपट त्याचा प्रीक्वल आणि चार साहिबजादे मालिकेतील शेवटचा चित्रपट आहे. ७ व्या शतकात घडणारा, 'हिंद दी चादर - गुरु लाधो रे' हा चित्रपट गुरु तेग बहादूरजींच्या बकाल्यापासून, जिथे त्यांना खरे गुरु म्हणून प्रकट करण्यात आले होते, तेथून सम्राट औरंगजेबाच्या जुलूमशाहीविरुद्ध त्यांनी निर्भयपणे उभे राहण्यापर्यंतचा प्रवास दाखवतो.

ज्या काळात देशभर दडपशाही आणि जबरदस्तीने धर्मांतर झाले, त्या काळात गुरु तेग बहादूरजी विरोधाचा आवाज बनले - श्रद्धा, स्वातंत्र्य आणि मानवतेच्या अधिकाराचे रक्षण करणारे आहे.

# 'एक दिन अपना घर होगा'



ही भूमिका त्यांच्या व्यक्तिगत भावनेशी अगदी मिळतीजुळती आहे.त्यांच्या पात्राप्रमाणेच, राजेंद्र यांनीही कठोर परिश्रम आणि आशेवर उभे असलेले स्वतःचे घर असावे या साध्या पण हृदयस्पर्शी स्वप्नासाठी आयुष्यभर प्रयत्न केले आहेत.

'लक्ष्मी निवास' या मालिकेत श्रीनिवास हा एक प्रामाणिक आणि निःस्वार्थी कुटुंबवत्सल माणूस आहे. त्याने आयुष्यभर घरातील जबाबदाऱ्या, मुलांचे शिक्षण, त्यांचे विवाह आणि पत्नी लक्ष्मीच्या तिच्या कुटुंबाबाबतच्या इच्छा पूर्ण करण्यात स्वतःला झोकून दिले आहे. पण या सगळ्या जबाबदाऱ्यांच्या गडबडीत आपल्या पत्नीसाठी स्वतःचे घर बांधण्याचे त्याचे स्वप्न नेहमीच मागे पडले. आता निवृत्ती जवळ येत असताना, ते जुने स्वप्न आणि वचन पुन्हा एकदा त्यांच्या नात्याचा केंद्रबिंदू बनले आहे.

आपले खरे आयुष्य 'लक्ष्मी निवास'मधील श्रीनिवासच्या कथेशी किती जुळते यावर विचार करताना राजेंद्र चावला यांनी आपल्या तरुणपणातील एक भावनिक आठवण शेअर केली, जी त्यांना स्थैर्य आणि स्वावलंबनाचा खरा अर्थ शिकवून गेली. राजेंद्रजी म्हणाले, "माझ्या दृष्टीने पाहिले तर माझ्या आयुष्याचा अर्धा भाग घर बांधण्याच्या स्वप्नासाठी गेला कारण मी माझा प्रवासच त्या एका स्वप्नासोबत सुरू केला होता. 'एक दिन अपना घर होगा'. जेव्हा तुम्ही मध्यमवर्गीय पार्श्वभूमीतून आला असता, तेव्हा फक्त स्वप्न बघत नाही, तर त्यासाठी नियोजन करता, बचत करता, त्याग करता. लहानपणापासून मी पाहिले की माझे आई-वडील प्रत्येक छोट्या बचतीला मोठ्या उद्दिष्टासाठी पायरी बनवत होते. मला अजूनही आठवतंय, एकदा वडिलांनी मला बँकेत नेले आणि म्हणाले, 'बेटा, आज तुझ्या नावाने एक छोटे फिक्स्ड डिपॉझिट करूया.'

**श्री. विजयकुमार चोबे तहसिलदार मुळशी (पौड) यांचे न्यायालय**

**नोटिस** केस क्र. हनो/१५५/एसआर/२०९/२०२५

(१) संतोष निवृत्ती साळुंके रा. रिहे ता. मुळशी, जि. पुणे ...वादी

**विरुध्द**

(१) भिमराव भगवान गजरमल। (२) मनोहर शंकर गजरामल (३) गुलाब शंकर गजरमल
(४) चंद्रभागा बबन गायकवाड (५) रंगुबाई शंकर गजरमल (६) मनोहर गोविंद गजरमल
(७) सुभद्रा निवृत्ती साळुंके (८) त्रिशाली सुनिल गायकवाड (९) वर्षा निवृत्ती साळुंके
(१०) संकेत निवृत्ती साळुंके (११) एकनाथ हरिभाऊ साळुंके (१२) कौशल्या नागसेन कांबळे
(१३) छाया सुरेश कांबळे (१४) माया हरीश साळवे (१५) सखुबाई काशिनाथ साळुंके
सर्व रा. रिहे ता. मुळशी, जि. पुणे ...प्रतिवादी

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १५५ अन्वये चौकशी.**

**:–दावा जमिनीचा तपशील–:**

| अ.क्र. | गावाचे नांव | स.नं./ग.नं. |
|---|---|---|
| १ | रिहे ता. मुळशी, जि पुणे | २४९/६ व इतर |

उपरोक्त तपशिलामध्ये नमुद केलेल्या मिळकतीबाबत वादी यांनी या कार्यालयास अर्ज केलेला आहे. प्रस्तुत अर्जास अनुसरुन या प्रकरणी उपरोक्त नमूद अधीनियमांतर्गत चौकशी दिनांक २८.११.२०२५ रोजी सकाळी/दुपारी ११.०० वाजता प्रस्तावित करणेत आलेली आहे. उक्त चौकशी दिवशी वेळेस आपण अथवा आपले विधिज्ञ/अधिकृत प्रतिनिधी यांनी आवश्यक त्या मुळ महसूली नक्कलासह उपस्थित रहावे. जर तुम्ही अथवा तुम्ही नियुक्त केलेले अभिकर्ते उपस्थित राहिले नाहीत. तर आपले अनुपस्थितीत निर्णय दिला जाईल यांची नोंद घ्यावी. तसेच सुनावनीचे तारखेनंतर ही नोटीस आपणास प्राप्त झाली तर आपण ही नोटीस मिळालेनंतर ०८ दिवसाचे आत इकडील कार्यालयात हजर राहून, पुढील सुणावनीची तारीख समक्ष घेवून जावे याकामी सुनावनीसाठी फेर नोटीस काढली जाणार नाही याची नोंद घ्यावी. उपरोक्त चौकशीकामी आपण गैरहजर राहिल्यास आपणास सर्व गोष्टी मान्य आहेत असे समजुन अंतिम निर्णय घेणेत येईल याची नोंद घ्यावी.

दि. ०७.११.२०२५ स्वा/- (विजय कुमार चोबे)
ठिकाण–मुळशी (पौड) तहसिलदार मुळशी (पौड)

प्रत– ग्राम महसूल अधिकारी रिहे, सोबतच्या नोटीस व प्रतिवादी यांना मुदतीत बजावून पुर्तता अहवाल सादर करणेत यावा.

**देहु नगरपंचायत देहु ता. हवेली जि. पुणे**

**जाहीर निविदा सुचना क्र ५/२०२५**

**जा.क्र./१५२५/२०२५** **दिनांक २४/११/२०२५**

मुख्याधिकारी देहु नगरपंचायत / विकास निधीतून १. देहू नगरपंचायत हद्दीतील चव्हाणनगर भाग १ येथे ड्रेनेज लाईन करणे या कामांची नोंदणीकृत अथवा ज्यांना अशा प्रकारच्या कामाच्या पुर्वनुभव व निविदा सादर करण्याची क्षमता आहे व जे निविदेमधील पात्रतेचे निकष पुर्ण करतात अशा इच्छुक कंत्राटदार कडुन निविदा मागवित आहोत कामाची निविदा फॉर्म विक्री व निविदा फॉर्म स्विकृती दिनांक १५/११/२०२५ वेळ १०.०० ते २२/११/२०२५ दुपारी २.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळून देहू नगरपंचायत कार्यालयात उपलब्ध राहील.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| श्री चेतन कोंडे | सौ. प्रियंका मोरे | सौ. पूजा दिवटे |
| मुख्याधिकारी | उपनगराध्यक्षा | नगराध्यक्षा |